# जिल्हा परिषद नांदेड

# नागरिककांची सनद

# शिक्षण विभाग,

# जिल्हा परिषद नांदेड

# शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नांदेड

## प्रस्तावना

मनुष्यबळ विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून ‘शिक्षण’ ही बाब अत्यंत महत्वपूर्ण ठरते. ६ ते १४ वयोगटाच्या्या सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण पुरविणे हे शासनाचे घटनात्मक दायित्व आहे. महाराष्ट्र शासनाच्याया विभागाकडून भविष्यात उज्वल पिढी घडविण्याकरितातसेच आर्थिक, सामजिक परिवर्तनाच्या दृष्टीने शैक्षणिकपायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता विविध उपक्रमराबविण्यात येतात. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत जिल्हा, तालूका आणि ग्रामस्तरावर केली जाते.

राज्यामध्ये शिक्षणा बरोबरच क्रीडा क्षेत्रात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व विकास होण्याच्यादृष्टीने शासनाने क्रीडा व युवक सेवा संचालनालय असे स्वतंत्र संचालनालय स्थापन केले आहे. यामार्फत विविध क्रीडा व युवक कल्याण विषयक कार्यक्रम राबविण्यात येतात. व यांची प्रत्यक्ष अंमलबाजावणी जिल्हा परिषद च्या शिक्षण विभागा मार्फत जिल्हास्तरावर केली जाते.

| | |
|---|---|
| प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण | राज्यातील ६ ते १४ वयोगटाच्या सर्व मुला - मुलींना प्राथमिक शिक्षण पुरविण्याच्या उद्देशाने ‘‘सर्व शिक्षा अभियान’’ हा महत्वाकांक्षी कार्यक्रम शासनाकडून राबविण्यात येतो. सदर उपक्रम राबविण्याकरिता प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई ही स्वतंत्र स्वायत्त संस्था निर्माण केली आहे. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार वेगाने झाल्यामुळे राज्यात माध्यमिक शिक्षणाचा विस्तारही मोठ्या प्रमाणात झालेली आहे. राज्यात माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळा प्रामुख्याने खाजगी संस्थांकडून चालविल्या जातात. सन १९७२-७३ पासून राज्यात १०+२+३ हा शैक्षणिक आकृतीबंध सुरु करण्यात आला असून +२ स्तरावरील कनिष्ठ महाविद्यालये सुरू करण्यात आलेली आहेत. |
| क्रीडा व युवक कल्याण | राज्य शासनाच्या शिक्षण प्रणालीमध्ये शारीरिक शिक्षण,क्रीडा व युवक सेवा यांचा समावेश आहे. क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी जुलै १९७० मध्ये क्रीडा व युवक सेवा संचालनालयाची स्थापना करण्यात आली आहे. या संचालनालयामार्फत राज्याची क्रीडा विषयक धोरणांची अंमलबजावणी करण्यात येते. आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद च्या शिक्षण विभागामार्फत या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येते. |

| | |
|---|---|
| विभागाची उद्दिष्टे | शालेय शिक्षण व क्रीडा क्षेत्रामध्ये खालील उद्दिष्टांची पूर्तता करण्यास शासन कटीबध्द आहे. तसेच या उद्दिष्ट पुर्तीचे कार्य पुर्तीचे कार्य जिल्हा परिषद शिक्षण विभागमार्फत पार पाडले जाते. |

१) प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावून व त्यामध्ये जीवनोपयोगी शिक्षणाचा समावेश करणे.

२) सर्व मुला-मुलींचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे.

३) शाळांतील विद्यार्थ्यांची गळती कमी करून १०० टक्के उपस्थितीचे उद्दिष्ट साध्य करणे.

४) ६ ते १४ वयोगटातील शाळा सोडलेली / शाळेत कधीच न गेलेली, स्थलांतरीत मुलांकरिता पर्यायी शिक्षणाचे उपक्रम राबविणे.

५) विशेष गरजा असलेल्या मुलांना शिक्षणाची समान संधी व सहभाग मिळवून देणे.

६) मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी विशेष कार्यक्रम राबविणे.

७) शैक्षणिक विकासासाठी असलेल्या केंद्राच्या पुढील योजना राज्यात प्रभावीपणे राबविणे.

अ) शालेय पोषण आहार योजना.

ब) संगणक प्रशिक्षणाच्या योजना.

क) शिष्यवृत्ती योजना.

ड) भाषिक/धार्मिक अल्पसंख्याकासंबंधीच्या शैक्षणिक योजना. तसेच मदरसा आधुनिकीकरण योजना.

८) प्राथमिक/माध्यमिक व महाविद्यालयीन शैक्षणिक पातळीपर्यंतच्या अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षणाचा समावेश व विकास करणे.

९) विद्यार्थ्यांसाठी क्रीडा स्पर्धा व मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करणे.

१०) क्रीडा विषयक पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता प्रत्येक विभाग/जिल्हा/तालुका स्तरावर क्रीडा संकुले उभी करणे.

११) युवक सेवा व युवक कल्याण विषयक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

विभागाची रचना

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन स्तरावरील प्रशासनिक विभागाकडून मुख्यत्वे करून धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यात येतो. शासन स्तरावर विभागाचे मंत्री / राज्यमंत्री यांचेबरोबर प्रशासनिक नियंत्रणाकरिता प्रधार सचिव / सचिव हे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी कार्यरत आहेत. त्यांच्या अधिपत्याखाली विभागाकडे सहसचिव / उपसचिव, अवर सचिव / कक्ष अधिकारी व इतर सहायक कर्मचारीवृंद कार्यरत आहे.

शासन स्तरावर महत्वाचे निर्णय / धोरणात्मक बाबी हाताळण्यात येतात. मात्र योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी क्षेत्रीय कार्यालयातील विभाग प्रमुख व त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांमार्फत होते. विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हास्तरिय व प्रमुखाची कार्यालय पुढील प्रमाणे आहेत. क्षेत्रीय स्तरावरील विभाग

## शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नांदेडची रचना दर्शविणारे
## विवरण पत्र-1 जिल्हा स्तर

शिक्षण समिती जि.प.नांदेड

मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नांदेड

### शिक्षण विभाग,जिल्हा परिषद नांदेड

| |
|---|
| शिक्षणाधिकारी (प्राथमिक) |
| उपशिक्षणाधिकारी (प्रा,) |
| उपशिक्षणाधिकारी (प्रा,) |

| |
|---|
| शिक्षणाधिकारी (माध्यमिक) |
| उपशिक्षणाधिकारी (मा,) |
| उपशिक्षणाधिकारी (मा,) |

### क्षेत्रीय कार्यालय विवरण पत्र-2 तालुका स्तर

| | | | |
|---|---|---|---|
| गट शिक्षणाधिकारी नांदेड<br>गट शिक्षणाधिकारी कंधार<br>गट शिक्षणाधिकारी मुखेड<br>गट शिक्षणाधिकारी देगलूर | गट शिक्षणाधिकारी बिलोली<br>गट शिक्षणाधिकारी भोकर<br>गट शिक्षणाधिकारी हदगांव<br>गट शिक्षणाधिकारी किनवट | गट शिक्षणाधिकारी लोहा<br>गट शिक्षणाधिकारी नायगांव<br>गट शिक्षणाधिकारी धर्माबाद<br>गट शिक्षणाधिकारी उमरी | गट शिक्षणाधिकारी अर्धापूर<br>गट शिक्षणाधिकारी मुदखेड<br>गट शिक्षणाधिकारी हिमायतनगर<br>गट शिक्षणाधिकारी माहूर |

### क्षेत्रीय कार्यालय विवरण पत्र-2 ग्रामस्तर

| | | | |
|---|---|---|---|
| मुख्याध्यापक (राजपत्रीत) जिल्हा परिषद हायस्कूल (48) | मुख्याध्यापक (अराजपत्रीत) जिल्हा परिषद हायस्कूल (13) | मुख्याध्यापक (अनुदानीत) जिल्हा परिषद हायस्कूल (9) | मुख्याध्यापक केंद्रिय प्राथमिक शाळा |